आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२७ मे २०२४ - सोमवार

**ठळक बातम्या**

- संपूर्ण देशात यंदा जून ते सप्टेंबरदरम्यान सामान्य पावसाचा हवामान विभागाचा अंदाज
- राज्य शिक्षण मंडळाच्या इयत्ता दहावीच्या परीक्षेत सुमारे ९६ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण / कोकण विभागाचा निकाल ९९ टक्क्यापेक्षा जास्त
- पुण्यातल्या पोर्शे कार अपघात प्रकरणी ससून रुग्णालयाच्या दोन डॉक्टरांसह तिघांना अटक, ३० मे पर्यंत पोलीस कोठडी
- अशियाई चॅम्पियन स्पर्धेत भारताच्या दीपा कर्माकरनं महिलांच्या वॉल्टमध्ये पटकावलं ऐतिहासिक सुवर्णपदक

  **आणि**

- मुंबई शेअर बाजाराच्या सेन्सेक्सनं ७६ हजारांचा टप्पा ओलांडला, मात्र दिवसअखेर घसरण

<><><><><>

संपूर्ण देशात यंदाच्या पावसाळ्यात जून ते सप्टेंबरदरम्यान सामान्य पावसाचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. यंदा देशात ४ टक्क्यांच्या तफावतीसह १०६ टक्के पाऊस पडेल, अशी माहिती हवामान विभागाचे महासंचालक डॉ. मृत्युंजय महापात्रा यांनी नैऋत्य मौसमी पावसासंबंधीचा दुसऱ्या टप्प्यातला अंदाज प्रकाशित करताना दिली. नैऋत्य मौसमी पाऊस मध्य आणि दक्षिणी द्वीपकल्पीय भागात सामान्य पातळीपेक्षा जास्त, वायव्य भागात सामान्य आणि ईशान्य भारतात सामान्य पातळीपेक्षा कमी पडेल, असा अंदाज महापात्रा यांनी वर्तवला. जून महिन्यातला पाऊस सामान्य राहील, असंही त्यांनी सांगितलं.

येत्या पाच दिवसांमध्ये नैऋत्य मौसमी वाऱ्यांचं केरळमध्ये आगमन होण्याच्या दृष्टीनं अनुकूल असल्याचंही त्यांनी नमूद केलं.

<><><><><>

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर मुंबईतल्या नालेसफाईची पाहणी केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज केली. पावसाळ्यापूर्वी ही सगळी काम पूर्ण करावीत, अशा सूचनी त्यांनी दिल्या.

<><><><><>

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळानं मार्चमधे घेतलेल्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र, म्हणजेच इयत्ता दहावीच्या परीक्षेचा निकाल आज जाहीर झाला. यंदा या परीक्षेत ९५ पूर्णांक  ८१ टक्के विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात मुलींची उत्तीर्ण होण्याची  टक्केवारी ९७ पूर्णांक २१ टक्के इतकी आहे, तर ९४ पूर्णांक ५६ टक्के इतकी मुलं उत्तीर्ण झाली आहेत.

यंदा कोकण विभागाचा निकाल सर्वाधिक म्हणजे ९९ पूर्णांक १ टक्के लागला असून मुंबई विभागाचा निकाल ९५ पूर्णांक ८३ टक्के इतका आहे. पुणे विभागाचा निकाल ९६ पूर्णांक ४४ टक्के, छत्रपती संभाजीनगर विभागाचा ९५ पूर्णांक १९ टक्के, कोल्हापूर विभागाचा ९७ पूर्णांक ४५ टक्के, अमरावती विभागाचा ९५ पूर्णांक ५८ टक्के, नाशिक विभागाचा ९५ पूर्णांक २८ टक्के,  लातूर विभागाचा ९५ पूर्णांक २७ टक्के आणि  नागपुर विभागाचा निकाल  ९४ पूर्णांक ७३ टक्के लागला आहे.  ७२ पैकी १८ विषयांचा निकाल १०० टक्के लागला आहे. तर १८७ विद्यार्थ्यांना प्रत्येकी १०० टक्के गुण मिळाले आहेत.

<><><><><>

आत्मनिर्भर भारत धोरणाचं उद्दिष्ट देशातल्या प्रतिभेला प्रोत्साहन देणं आणि रोजगारक्षमता वाढवणं आहे, असं प्रधानमंत्री भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी म्हणाले. एका वृत्तसंस्थेला दिलेल्या मुलाखतीत ते बोलत होते. सरकारनं थेट लाभ हस्तांतराच्या माध्यमातून आतापर्यंत ३८ लाख कोटी रुपये लोकांना दिल्याचंही मोदी यांनी सांगितलं.

**<><><><><>**

निवडणूक ही कार्यकर्त्यांची परीक्षा असून कार्यकर्ता हा पक्षाचा कणा असतो त्याला जपलं गेलं पाहिजे, तसंच आता विधानसभा निवडणुकीवर लक्ष केंद्रीत करावं, असं आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पक्ष कार्यकर्त्यांना केलं आहे. ते आज मुंबईत राष्ट्रवादी काँग्रेसच्या पदाधिकारा आणि कार्यकर्त्यांच्या बैठकीत बोलत होते. येत्या १० जूनला राष्ट्रवादी काँग्रेसचा २५ वा वर्धापनदिन आहे, त्यानिमित्त प्रत्येक जिल्ह्यात विविध कार्यक्रम राबवावण्याचं आवाहन त्यांनी केलं.

विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागून त्यादृष्टीनं पक्षाची संघटनात्मक बांधणी करण्यावर भर द्यावा, असं आवाहन पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी केलं. यावेळी प्रफुल्ल पटेल, प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे, आदी मान्यवर उपस्थित होते.

**<><><><><>**

विधान परिषदेच्या कोकण विभाग पदवीधर मतदारसंघासाठी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने अभिजित पानसे यांची उमेदवारी जाहीर केली आहे. मनसेचे सरचिटणीस शिरीष सावंत यांनी ही घोषणा केली. विधान परिषदेच्या चार जागांसाठी २६ जून रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><>**

पुण्याच्या कल्याणी नगर भागात झालेल्या पोर्शे कार अपघात प्रकरणात पुणे पोलिसांनी ससून रुग्णालयाच्या न्यायपूरक विज्ञान विभागाचे प्रमुख डॉ. अजय टावरे आणि डॉ. श्रीहरी हरलोर यांना तसंच वॉर्ड बॉय अतुल घटकांबळे अशा तिघांना अटक केली आहे. अल्पवयीन आरोपीच्या रक्ताच्या नमुन्यांमध्ये फेरफार केल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या तिघांना आज न्यायालयात हजर करण्यात आलं. तिघांनाही ३० मे पर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश न्यायालयानं दिले. या दोन डॉक्टरांनी आरोपी मुलाच्या वडिलांच्या सांगण्यावरून पुराव्यांशी छेडछाड तसंच रक्ताचे नमुने बदलल्याचं तपासात उघड झालं आहे, पोलीस आयुक्त आमितेश कुमार यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. डॉक्टरांच्या अटकेनंतर गुन्हेगारी कट रचणं, पुरावे बदलणं आणि पुरावे नष्ट करणं अशा आरोपांचाही या प्रकरणात समावेश करण्यात आल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उझबेकिस्तानमधे ताश्कंद इथल्या अशियाई चॅम्पियन स्पर्धेत भारताच्या दीपा कर्माकरनं महिलांच्या वॉल्टमध्ये सुवर्णपदक जिंकून इतिहास रचला आहे. दीपानं १३ पूर्णांक ५६ शतांश गुणांसह हा विजय मिळवला आहे. या स्पर्धेत सुवर्णपदक जिंकणारी ती पहिलीच भारतीय खेळाडू आहे.

**<><><><><>**

एफआयएच हॉकी प्रो लीग युरोपीय स्पर्धेच्या चौथ्या सामन्यात भारतानं हरमनप्रीत सिंहच्या हॅटट्रिकच्या जोरावर अर्जेंटिनाचा ५-४ असा पराभव केला. भारतासाठी अरैजीत सिंह हुंदल आणि गुरजंत सिंह यांनी प्रत्येकी एक आणि हरमनप्रीत सिंहनं तीन गोल नोंदवले. भारताचा पुढचा सामना १ जूनला जर्मनीसोबत होणार आहे.

**<><><><>**

मुंबई शेअर बाजाराचा निर्देशांक सेन्सेक्स आणि राष्ट्रीय शेअर बाजाराचा निर्देशांक निफ्टीनं आज दिवसभराच्या व्यवहारात आजवरच्या उच्चांकी पातळीला स्पर्श केला. आज दुपारी सेन्सेक्सनं ७६ हजारांची पातळी ओलांडली होती. तर निफ्टी २३ हजाराची पातळी ओलांडून, २३ हजार १०७ अंकांपर्यंत पोहोचला होता.

लोकसभा निवडणुकीचे अनुकुल निकाल लागण्याची शक्यता तसंच जागतिक पातळीवर कच्च्या तेलाच्या किमतीत झालेली घसरण यामुळे शेअर बाजारानं उसळी घेतल्याचं मत तज्ञांनी व्यक्त केलं आहे.

मात्र दिवसभराच्या व्यवहारानंतर शुक्रवारच्या तुलनेत सेनेक्स १९ अंकांची घसरण नोंदवत ७५ हजार ३९० अंकांवर बंद झाला तर निफ्टी २४ अंकांनी घसरून २२ हजार ९३२ अंकांवर बंद झाला.

**<><><><>**

महाराष्ट्रात पाऊस आणि वादळी वाऱ्यामुळं पाच जणांचा मृत्यू झाला आहे. **जळगावात** वादळामुळे घर कोसळून एकाच कुटुंबातले चार जण मृत्युमुखी पडले, तर धाराशीवच्या सांगवी गावात इथं वादळी वाऱ्यात घरावरचं छप्पर उडून गेल्याने दगड डोक्यात पडून एकाचा मृत्यू झाला. जळगावच्या जामनेरमध्ये पावसामुळं केळीच्या बागांना मोठा फटका बसला. मलकापूर पोलीस स्थानकाच्या इमारतीवरचे पत्रे उडाले आणि साहित्याचंही नुकसान झालं.

**सोलापूर**च्या माढा शहरासह अनेक भागात शेतांमध्ये पाणी साचल्यामुळे पिकांचं नुकसान झालं. मोहोळ तालुक्यातल्या देवडी फाट्याजवळ पेट्रोल पंपाचं छत कोसळलं. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही.

**सांगली** जिल्ह्याच्या पूर्व भागात काल वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला. मिरज, कवठेमहांकाळ आणि जत तालुक्यात जोरदार पाऊस झाला. पावसामुळं अनेक घरांचे पत्रे उडून गेले आहेत. विद्युत खांब आणि झाडे उन्मळून पडले असून महावितरण आणि शेतकऱ्यांच मोठं नुकसान झालं आहे.

**छत्रपती संभाजीनगर** जिल्ह्यात काही ठिकाणी काल रात्री झालेल्या पावसाचा फटका मिरची पेरणीला बसला. वीज पडल्यामुळे आठ जनावरं दगावली. सिल्लोड तालुक्यातही शेतीचं मोठं नुकसान झालं.

**<><><><><>**

रोजगार हमी योजनेच्या कामावर बोगस मजूर दाखवून शासनाचे पैसे लाटण्याचा प्रकार भंडारा जिल्ह्यात तुमसर तालुक्यातल्या खैरलांजी इथं उघडकीला आला आहे. ग्रामपंचायत सदस्यांनी याबाबत गटविकास अधिकाऱ्यांकडे तक्रार करून दोषी रोजगार सेवकावर कारवाईची मागणी केली आहे. याविषयी चौकशी सुरु असल्याचं गटविकास अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

मालेगावचे माजी महापौर अब्दुल मलिक युनूस ईसा यांच्यावर मध्यरात्री अज्ञात हल्लेखोरांनी गोळीबार केला. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी नाशिकच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. या घटनेनंतर मालेगावात पोलीस बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात संपूर्ण राज्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडला. विदर्भात काही ठिकाणी आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी कमाल तापमानात किंचित वाढ झाली, तर मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी किंचित घट झाली.

कोकण आणि मध्य महाराष्ट्रात पुढचा आठवडाभर तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. मराठवाड्यात आज आणि उद्या, तर विदर्भात आज तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता आहे. विदर्भात येत्या बुधवारपर्यंत उष्णतेची लाट राहण्याची शक्यता आहे.